# शासकीय शैक्षणिक सवलती

**महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाने विविध प्रकारच्या सवलती उपलब्ध करुन दिल्या आहेत. पात्र विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता यावा यासाठी सर्व प्रकारच्या सवलत अर्जासोबत रेशनकार्डमधील कौटुंबिक माहिती असणाऱ्या पानांची झेरॉक्स जोडणे आवश्यक आहे.**

### १) ई. बी. सी. सवलत:

महाविद्यालयातील अनुदानित तुकड्यांमधील ज्या विद्यार्थ्यांचे आई - वडिलांचे अगर आई वडिल हयात नसल्यास पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.२,५०,०००/- पेक्षा जास्त नाही, तसेच भावंडांची संख्या स्वतः सह २ पेक्षा जास्त नाही अशा विद्यार्थ्यांना ई. बी. सी. सवलतीचा लाभ घेता येतो. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सदर सलवतीचा अर्ज करण्याची पध्दतीत बदल झाला असून वेबसाईट सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांना सूचीत केले जाते. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने नवीन अर्ज नोंदणी तसेच नुतनिकरण करावयाचे असते. सदर सवलीसाठी चालू शैक्षणिक वर्षापूर्वी संपलेल्या आर्थिक वर्षातील म्हणजे १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या वर्षाचे एकूण उत्पन्न विचारात घ्यावयाचे असते आणि सदर उत्पन्नाचा दाखला तहसीलदारांच्या सहीचा असावा लागतो. वडिल हयात नसल्यास आईच्या नावाने अर्ज करावा मात्र अर्जासोबत वडीलांच्या मृत्युचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

### २) प्राथमिक शिक्षकांच्या मुला - मुलींना मिळणारी (पी. टी. सी.) सवलत

सरकारी शाळा, स्थानिक संस्थांच्या ( नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हापरिषद ) शाळा, मान्यताप्राप्त व अनुदानप्राप्त खाजगी शाळांतील शिक्षकांच्या मुला - मुलींना त्यांचे आई - वडिलांचे उत्पन्न विचारात न घेता शिक्षण शुल्क फी माफीची सवलत मिळते. फी-सवलतीच्या विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. माध्यमिक शाळांतील इ. ५ वी ते ८ वी पर्यंतच्या वर्गांना शिकवणाऱ्या व प्राथमिक शिक्षकांएवढे वेतनमान असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनाही प्राथमिक शिक्षकांप्रमाणेच फी माफीची सवलत मिळते. ही सवलत महाविद्यालयातील अनुदानित तुकड्यांमधील फक्त दोन पाल्यांनाच मिळते.

### ३) माध्यमिक शिक्षकांच्या मुला - मुलींना मिळणारी (एस. एस. टी.) सवलत

शैक्षणिक वर्ष १९९५-९६ पासून शासनाने माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या दोन पाल्यांना फी मध्ये सवलत देण्याची योजना सुरु केली आहे. यासाठी विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ही सवलत महाविद्यालयातील अनुदानित तुकड्यांमधील विद्यार्थ्यांनाच मिळते.

### ४) सरकारी, स्थानिक स्वराज्य, संस्थांच्या, कर्मचाऱ्यांच्या मुला- मुलींना मिळणारी फी सवलत

महाविद्यालयातील अनुदानित तुकड्यांमधील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे मागील आर्थिक वर्षा तील निव्वळ उत्पन्न (फक्त बेसिक पे ) रु. १५०००/- पेक्षा जास्त नाही त्यांच्या मुला-मुलींना ही सवलत मिळते. सदर सवलतींसाठी विहित अर्ज (ई. बी. सी. नमुना) उत्पन्नाच्या दाखल्यासह विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. उत्पन्नाच्या दाखल्यावर कार्यालय प्रमुखाची किंवा पगार काढणाऱ्या अधिकाऱ्याची सही असणे आवश्यक आहे.

### ५) सैन्यातील जवानांच्या मुला- मुलींना मिळणारी फी सवलत:

महाविद्यालयातील अनुदानित तुकड्यांमधील ज्या विद्यार्थ्यांचे वडिल सध्या सैन्यात असतील त्यांना ही सवलत मिळते. प्रत्येक अर्जासोबत ठराविक नमुन्यातील अर्जाच्या दोन प्रती देणे आवश्यक आहे. अर्जासोबत जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सैनिक व नाविक वैमानिक मंडळ यांच्या सहीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

### ६) माजी सैनिकांच्या मुला- मुलींना मिळणारी फी सवलत :

महाविद्यालयातील अनुदानित तुकड्यांमधील विद्यार्थ्यांना ही सवलत मिळण्यासाठी विहित नमुन्यातील अर्जासोबत

स्वातंत्र्य सैनिक म्हणून मिळालेल्या सन्मानपत्राच्या सत्यप्रतींसह अर्ज सादर करणे आवश्यक आहे. मागील वर्षी ही सवलत मंजूर झाली असल्यास त्याबाबतचा तपशील व मागील वार्षिक परीक्षेच्या गुणपत्राच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

### ७) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुला-मुलींना मिळणारी फी सवलत :

महाविद्यालयातील अनुदानित तुकड्यांमधील विद्यार्थ्यांना ही सवलत मिळण्यासाठी विहित नमुन्यातील अर्जासोबत स्वातंत्र्य सैनिक म्हणून मिळालेल्या सन्मानपत्राच्या सत्यप्रतींसह अर्ज सादर करणे आवश्यक आहे. मागील वर्षी ही सवलत मंजूर झाली असल्यास त्याबाबतचा तपशील व मागील वार्षिक परीक्षेच्या गुणपत्रकाच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

### ८) मागासवर्गीय (एस.सी.) व इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी. व एन.टी.) विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत

प्रथम वर्ष पदवी - पदव्योत्तर महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी त्या शैक्षणिक वर्षाचे ई- शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरण्याकरीता वेबसाईट सुरु झाल्यानंतर सूचना प्रसिध्द केली जाईल. विद्यार्थ्याने आपला अर्ज व सोबत खालील कागदपत्रे मुदतीत महाविद्यालयाच्या कार्यालयात जमा करावयाचे आहेत. अर्जासोबत पुढील कागदपत्रे जोडणे अनिवार्य आहे.

१) जातीचा दाखला सत्यप्रत आणि जात वैधता प्रमाणपत्र सत्यप्रत (असल्यास)

२) दोन लाख पर्यंत उत्पन्न असणाऱ्या एस. सी. विद्यार्थ्यांच्या पालकांनी २०२२ - २०२३ या कालावधीत पालक नोकरी करत असल्यास त्यांचे मूळ वेतन + महागाई भत्ता व इतर सर्व भत्यांसह उत्पन्नाचा दाखला व नोकरी करीत नसलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी तहसिलदारांच्या सहीचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

३) मागील वर्षाचे गुणपत्रक

४) एखादे वर्षी शिक्षणात खंड असल्यास त्या काळातील गॅप सर्टिफिकेट रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर तहसिलदार यांच्या सहीचे जोडावे.

५) सोबत राष्ट्रीयकृत बँकेच्या स्वतःच्या नावे असलेल्या खात्याच्या पासबुकची प्रथम पानाची सत्यप्रत (स्टेट बँक, बँक ऑफ इंडिया, महाराष्ट्र बँक, जनता बँक इ.)

६) वसतिगृहात रहात असल्यास त्यांचे प्रमाणपत्र

७) इतर महाविद्यालयातून आला असेल तर मागील वर्षीच्या शिष्यवृत्तीचा आदेश क्रमांक आणि मागील महाविद्यालयाने विद्यार्थ्याचा अर्ज त्यांचे लॉग ईन मधुन फेटाळल्याचे पत्र आवश्यक, एक लाखांपेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वरीप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता आवश्यक आहे.

८) आधार कार्डाच्या दोन सत्यप्रती

९) निवडणूक ओळखपत्राची सत्यप्रत

**टिप: ज्या मागासवर्गीय (एस. सी.) विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न २,००,०००/- पेक्षा अधिक असेल अशा विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मिळणार नाही. परंतु कोणत्याही प्रकारची फी आकारली जाणार नाही.**

**रु.१,००,०००/- पेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या इतर मागास (ओ. बी. सी. व एन. टी) विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मिळणार नाही. परंतु कोणत्याही प्रकारची फी आकारली जाणार नाही.**

**जे विद्यार्थी मुदतीत अर्ज व कागदपत्रे सादर करु शकणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना त्या शैक्षणिक वर्षाची फी भरावी लागेल. संगणक विज्ञान अभ्यासक्रमाकरीता ( एस. सी . आणि एस. टी. ) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल. परंतू (ओ. बी. सी. व एन. टी) विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती लागू नाही.**

### १०) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती बाबत सूचना

१) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण / २००७ (५४२/०७) तांशी - १ दि. २१-०१-२००८ अन्वये मुस्लिम, ख्रिश्चन,

पारशी, शीख, व बौद्ध समाजातील गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांसाठी

२) अल्पसंख्यांक समाजातील कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न २,००,०००/- पेक्षा कमी असेल अशा विद्यार्थ्यांना या योजनेखालील शिष्यवृत्ती मिळणेसंबंधी अर्ज भरावयाचा आहे.

३) जे विद्यार्थी शासनाच्या निकषाप्रमाणे या शिष्यवृत्तीस पात्र ठरतील अशाच विद्यार्थ्यांना भरलेली फी परत केली जाईल.

**११) अपंग विद्यार्थ्यांना मिळणारी शैक्षणिक सवलत:**

शासनाच्या नियमानूसार अपंग असणाऱ्या विद्यार्थ्यांना समाजकल्याण अधिकारी यांच्यामार्फत शैक्षणिक सवलत व शिष्यवृत्ती देण्यात येते. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या विहित नमुन्यातील अर्ज ठराविक मुदतीत आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह सादर करणे आवश्यक आहे.

**१२) शिष्यवृत्ती योजना:** राज्य शासनामार्फत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जशी गुणवत्ता शिष्यवृत्ती देण्याची योजना आहे तशी संस्थेमार्फतही हुशार, होतकरु व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना कार्यरत आहे.

**राज्यशासनाची शिष्यवृत्ती :**

१) राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती

२) राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती

३) इतर मागास वर्गीय शिष्यवृत्ती

४) राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती

५) प्राथमिक/ माध्यमिक शिक्षकांच्या मुला-मुलींना मिळणारी शिष्यवृत्ती

६) ग्रामीण भागातील हुशार व होतकरु विद्यार्थ्यांना देण्यात येणारी गुणवत्ता शिष्यवृत्ती

या शिष्यवृत्या मिळण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह ठराविक त्या मुदतीत कार्यालयात सादर करणे आवश्यक असते. विद्यार्थी एकापेक्षा अधिक शिष्यवृत्या मिळविण्यासाठी पात्रतेच्या अटी पूर्ण करित असल्यास अर्ज भरु शकतो. मात्र एका वेळी एकाच शिष्यवृत्तीची रक्कम स्वीकारण्यात येते.

**१३) देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाने जाहिर केलेल्या बक्षिस योजना**

महाविद्यालयातील शासनमान्य / विद्यापीठमान्य कला - क्रीडा स्पर्धांत उत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना प्रोत्साहन देण्यासाठी देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाचे खालील प्रकारे बक्षिस योजना जाहिर केली आहे.

| स्तर | व्यक्तिगत कामगिरी | | | सांघिक कामगिरी | |
|---|---|---|---|---|---|
| | प्रथम | द्वितीय | तृतीय | प्रथम | द्वितीय |
| **जिल्हा** | २५०/- | १५०/- | १००/- | ५००/- | ३००/- |
| **विभाग / विद्यापीठ** | ५००/- | ३००/- | २००/- | ७५०/- | ५००/- |
| **राज्य** | १०००/- | ५००/- | ३००/- | १०००/- | ७५०/- |
| **राष्ट्रीय** | १५००/- | १०००/- | ५००/- | ३०००/- | २०००/- |
| **आंतरराष्ट्रीय** | ३०००/- | २०००/- | १५००/- | ५०००/- | ३०००/- |

तसेच संशोधन क्षेत्रात जिल्हा, राज्य, राष्ट्र, व विद्यापीठ स्तरावर उत्तम कामगिरी करणाऱ्या शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाने पुढील प्रमाणे प्रोस्तहानपर बक्षिस योजना जाहीर केली आहे.

| स्तर | व्यक्तिगत कामगिरी | | | सांघिक कामगिरी | |
|---|---|---|---|---|---|
| | प्रथम | द्वितीय | तृतीय | प्रथम | द्वितीय |
| **जिल्हा** | २५०/- | १५०/- | १००/- | ५००/- | ३००/- |
| **विभाग / विद्यापीठ** | ५००/- | ३००/- | २००/- | ७५०/- | ५००/- |
| **राज्य** | १०००/- | ५००/- | ३००/- | १०००/- | ७५०/- |
| **राष्ट्रीय** | १५००/- | १०००/- | ५००/- | ३०००/- | २०००/- |
| **आंतरराष्ट्रीय** | ३०००/- | २०००/- | १५००/- | ५०००/- | ३०००/- |

## शैक्षणिक पारितोषिके / शिष्यवृत्या:

| अ. क्र. | पारितोषिकाचे विवरण | रक्कम |
|---|---|---|
| **१** | कै. प्रकाश रघुनाथ सप्रे यांच्या स्मरणार्थ - श्रीमती. विद्या प्रकाश सप्रे यांच्याकडून - तृतीय वर्ष कला वर्गात प्रथम येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | २०००/- |
| **२** | कै. प्रकाश रघुनाथ सप्रे यांच्या स्मरणार्थ - श्रीमती. विद्या प्रकाश सप्रे यांच्याकडून - तृतीय वर्ष वाणिज्य वर्गात प्रथम येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | २०००/- |
| **३** | कै. प्रकाश रघुनाथ सप्रे यांच्या स्मरणार्थ - श्रीमती. विद्या प्रकाश सप्रे यांच्याकडून - तृतीय वर्ष रसायनशास्त्र विषयात प्रथम येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | २०००/- |
| **४** | कै. प्रकाश रघुनाथ सप्रे यांच्या स्मरणार्थ - श्रीमती. विद्या प्रकाश सप्रे यांच्याकडून - तृतीय वर्ष भौतिकशास्त्र विषयात प्रथम येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | २०००/- |
| **५** | कै. प्रकाश रघुनाथ सप्रे यांच्या स्मरणार्थ - श्रीमती. विद्या प्रकाश सप्रे यांच्याकडून - तृतीय वर्ष संगणक विज्ञान वर्गात प्रथम येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | २०००/- |
| **६** | कै. प्रकाश रघुनाथ सप्रे यांच्या स्मरणार्थ - श्रीमती. विद्या प्रकाश सप्रे यांच्याकडून - व्दितीय वर्ष पदव्युत्तर रसायनशास्त्र (ऑरगॅनिक) वर्गात प्रथम येणा-या विद्यार्थी / विद्यार्थीनीस | २०००/- |
| **७** | कै. प्रकाश रघुनाथ सप्रे यांच्या स्मरणार्थ - श्रीमती. विद्या प्रकाश सप्रे यांच्याकडून - व्दितीय वर्ष पदव्युत्तर रसायनशास्त्र (ॲनालॅटिकल) वर्गात प्रथम येणा-या विद्यार्थी / विद्यार्थीनीस | २०००/- |
| **८** | कै. प्रकाश रघुनाथ सप्रे यांच्या स्मरणार्थ - श्रीमती. विद्या प्रकाश सप्रे यांच्याकडून - व्दितीय वर्ष पदव्युत्तर भौतिकशास्त्र वर्गात प्रथम येणा-या विद्यार्थी / विद्यार्थीनीस | २०००/- |
| **९** | देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, देवरुख यांचेकडून - कला शाखेत प्रथम येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | १०००/- |
| **१०** | देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, देवरुख यांचेकडून - कला शाखेत व्दितीय येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | ७५०/- |
| **११** | देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, देवरुख यांचेकडून - कला शाखेत तृतीय येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | ५००/- |
| **१२** | देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, देवरुख यांचेकडून - वाणिज्य शाखेत प्रथम येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | १०००/- |

| | | |
|---|---|---|
| **१३** | देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, देवरुख यांचेकडून<br>- वाणिज्य शाखेत व्दितीय येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | ७५०/- |
| **१४** | देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, देवरुख यांचेकडून<br>- वाणिज्य शाखेत तृतीय येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | ५००/- |
| **१५** | देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, देवरुख यांचेकडून<br>- विज्ञान व संगणक विज्ञान शाखेत प्रथम येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | १०००/- |
| **१६** | देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, देवरुख यांचेकडून<br>- विज्ञान व संगणक विज्ञान शाखेत व्दितीय येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | ७५०/- |
| **१७** | देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, देवरुख यांचेकडून<br>- विज्ञान व संगणक विज्ञान शाखेत तृतीय येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | ५००/- |
| **१८** | देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, देवरुख यांचेकडून<br>- पदव्युत्तर विज्ञान विभागात प्रथम येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | १५००/- |
| **१९** | देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, देवरुख यांचेकडून<br>- पदव्युत्तर विज्ञान विभागात व्दितीय येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | १०००/- |
| **२०** | देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, देवरुख यांचेकडून<br>- पदव्युत्तर विज्ञान विभागात तृतीय येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | ७५०/- |
| **२१** | देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, देवरुख यांचेकडून<br>- पदव्युत्तर कला विभागात प्रथम येणा-या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीस | १५००/- |
| **२२** | कै. कुमारी ललिता सावळाराम भोसले शिष्यवृत्ती<br>१) तृतीय वर्ष कला या वर्गात संपूर्ण मराठी हा विषय घेवून उत्तीर्ण होणाऱ्या व मराठी या विषयात गुणानुक्रमे प्रथम येणा-या विद्यार्थी अथवा विद्यार्थिनीस<br>वरिल अटीप्रमाणे मात्र विद्यार्थी अथवा विद्यार्थिनी नसल्यास :<br>२) तृतीय वर्ष कला या वर्गात मराठी विषयाचे तीन पेपर घेवून उत्तीर्ण होणाऱ्या व मराठी विषयात गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थी अथवा विद्यार्थिनीस<br>वरिल (१) व (२) प्रमाणे पात्र विद्यार्थी अथवा विद्यार्थिनी नसल्यासः<br>३) तृतीय वर्ष कला या वर्गात उत्तीर्ण होवून गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थी अथवा विद्यार्थिनीस | ५०१/- |
| **२३** | कै. गिरीश त्रिंबक मराठे स्मरणार्थ पारितोषिक<br>बी.एस्सी पदवी परीक्षेला भौतिकशास्त्र हा विषय घेऊन सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस | ७००/- |